महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-५/परीक्षा /म.लो.आ. / २०२२-२३/ 5894

दिनांक : 16 DEC 2022

16 DEC 2022

**परिपत्रक**

**परीक्षा प्राधान्य/अति महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
असलेल्या सर्व संस्था (पुणे विभाग, पुणे)

**विषय : राज्य सेवा मुख्य परीक्षा – २०२२ परीक्षेच्या आयोजनाकरिता शाळा/महाविद्यालय उपलब्ध करुन देणेबाबत.**

**संदर्भ :** १) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. एसएसई-२०२२/सीआर-३०/२०२२/तेरा, दि. १२.१२.२०२२ रोजीचे पत्र.
२) संचालनालय मुंबई यांचे पत्र क्र.४/आस्था/म.लो.आ.परीक्षा/२०२२/८७२ दि.१३.१२.२०२२

**उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र वाचावे.**

उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शनिवार, रविवार व सोमवार दि. २१, २२ व २३ जानेवारी २०२३ रोजी नियोजित **राज्य सेवा मुख्य परिक्षा २०२२ आयोजित करण्यात आली आहे.** परीक्षेच्या सुरळीत आयोजनासाठी करावी लागणारी सर्व प्रकारची व्यवस्था लक्षात घेता या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पदवी/पदविका महाविद्यालयांची उपलब्धता दि. १९.१२.२०२२ पर्यंत अंतीम करण्याबाबत संदर्भ क्र.०२ पत्रान्वये निर्देश देण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवीका/पदवी महाविद्यालयांच्या संस्थाप्रमूखांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मागणीनुसार **राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२२ करीता सर्व संस्थांनी आप-आपल्या संस्थेची अचूक माहिती सोबत दिलेल्या लिंकद्वारे गुगल फार्म मध्ये शनिवार दिनांक १७.१२.२०२२ रोजीपर्यंत सायंकाळी ०५ वाजेपर्यंत भरावी.**

तसेच आवश्यकता भासल्यास सदर दिवशी संस्थेला स्थानिक सुट्टी जाहीर करावी.

गुगल लिंक :- १. https://forms.gle/2sUzcXtvS9UPpRsaA
२. https://forms.gle/arDc13KrpprU5phU8

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल–desk4@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : ४/आस्था/म.लो.आ. परीक्षा/२०२२/८७२ दिनांक: 13 DEC 2022

प्रति,
१. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
२. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : राज्य सेवा मुख्य परीक्षा – २०२२.
परीक्षेच्या आयोजनाकरिता शाळा / महाविद्यालय उपलब्ध करुन देण्याबाबत.
संदर्भ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.एसएसई-२०२२/सीआर-३०/२०२२/तेरा, दि.१२.१२.२०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शनिवार, रविवार व सोमवार दि.२१, २२ व २३ जानेवारी २०२३ रोजी नियोजित राज्य सेवा मुख्य परिक्षा २०२२ मुंबईसह, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व पुणे अशा एकूण ६ जिल्हाकेंद्रावर आयोजित करण्यात आली आहे. परीक्षेच्या सुरळीत आयोजनासाठी करावी लागणारी सर्व प्रकारची व्यवस्था लक्षात घेता आपल्या अधिपत्याखालील पदवी / पदविका महाविद्यालयांची उपलब्धता दि.१९.१२.२०२२ पर्यंत करण्याबाबत संदर्भाधिन पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहे. (प्रत संलग्न)

त्यास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व पदवी / पदविका महाविद्यालयांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मागणीनुसार दि.२१, २२ व २३ जानेवारी २०२३ रोजी राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२२ साठी पदवी / पदविका महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात. तसेच संदर्भाधिन पत्रात दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करुन एकत्रित अहवाल परस्पर महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांना पाठविण्यात यावा व त्याची एक प्रत संचालनालयास सादर करावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
15 DEC 2022
आवक क्र. ९९६९०

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : सहसचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया-इमारत ३ रा मजला फोर्ट मुंबई - ४००००१.

C:\Users\Desk4\Desktop\ARCHANA - Copy\MPSC-Exam-Duty.doc